# पतीचा गळा आवळून खून दत्तनगरची खळबळजनक घटना

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** श्रीरामपूर येथील दत्तनगरमध्ये पत्नीने पतीच्या डोक्यात लाकुड मारत गळा आवळून खून केल्याची खळबळजनक घटना घडली आहे. सदर महिलेचा पती हा दारु पिवुन मारहाण करत तिच्यावर सतत संशय घेत होता. या त्रासाला कंटाळून महिलेने टोकाचे पाऊल उचलत पतीचा खून केला. पोलिसांच्या तपासात महिलेने खून केल्याची कबुली दिली असून रश्मिता मानसकुमार शाहु असे या आरोपी महिलेचे नाव आहे.

याबाबत पोकॉ कैलास तुकाराम झिने, वय- ५० वर्षे, नेमणूक-श्रीरामपुर शहर पोलीस स्टेशन यांनी सरकारतर्फे फिर्यादी होवुन दिलेल्या फिर्यादित म्हटले आहे की, दि.२४ रोजी दत्तनगरचे पोलीस पाटील अनिल गायकवाड यांनी एक व्यक्ती मृत झाला असल्याबाबत कळवले. त्यावरुन मी सदर ठिकाणी जावुन पाहणी केली असता प्रथमदर्शनी मृताच्या डोक्याला मार लागलेला व त्यातुन रक्त निघाल्याचे दिसले. तसेच त्याच्या गळयावर उजव्या बाजूला काळया रंगाचा व्रण दिसला. अधिक चौकशी केली असता सदरचे घर विजू पटाट यांचे असुन त्यांचे घरी मानसकुमार शाहु हे भाडोत्री राहत असल्याचे समजले. तेथे असलेल्या रश्मिता मानसकुमार शाहु हिच्याकडे चौकशी केली असता तिने मृत व्यक्ती हा तिचा पती असल्याचे सांगुन त्याच्या मृत्यू बाबत उडवाउडवीची उत्तरे दिली. तसेच ती मृत व्यक्तीला हॉस्पीटलमध्ये घेऊन जाण्यास नकार देत तात्काळ अंत्यविधी करण्याचा आग्रह धरत होती. त्यावर मी मृतदेह साखर कामगार हॉस्पीटल येथे घेऊन गेलो. तेथे वैद्यकीय अधिकारी यांनी त्यास उपचारापूर्वीच मयत घोषीत केले. सदर घटनेबाबत पो.नि.नितीन देशमुख यांना सविस्तर माहिती कळवत याबाबत श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन आ.मृ नं १०/२०२६ बी.एन.एस.एस कलम १९४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. त्यांनंतर मृतदेहाचे प्रवरा ग्रामीण रुग्णालय, लोणी येथे शवविच्छेदन करण्यात आले. सदर व्यक्तीच्या मृत्यूबाबत त्याची पत्नी रश्मिता मानसकुमार शाहु हिचेकडे पो.नि देशमुख, सपोनि जाधव यांनी तिला विश्वासात घेऊन सखोल चौकशी केली असता तिने माझा पती मानसकुमार शाहु हा दारु पिऊन मला खूप मारहाण करत असे व सतत संशय घेत असे. त्यामुळे मी त्याच्या डोक्यात आंब्याचे झाडाचे लाकुड मारुन व गळा आवळुन मारुन टाकल्याची कबुली दिली. त्यामुळे बी.एन.एस १०३ (१) प्रमाणे मृताची पत्नी रश्मिता शाहू हिच्या विरोधात पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.

# संगमनेर, पारनेरमध्ये डिफेन्स क्लस्टर प्रयत्न- ना. विखे

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** अहिल्यानगर जिल्हा डिफेन्स क्लस्टर करण्यासंदर्भात निर्णय झालेला आहे. त्यानुसार शिर्डी येथे डिफेन्स संदर्भात काही उद्योग सुरू झाले आहेत. आता पारनेर व संगमनेर येथेही या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत, अशी माहिती पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी रविवारी येथे दिली. पारनेरमधील वन खात्याची ५ हजार एकर जमीन व संगमनेरमधील एक हजार एकर जमीन यासाठी मिळवण्याचे प्रयत्न आ. काशिनाथ दाते व आ. अमोल खताळ यांच्याद्वारे होणार आहेत. दावोस येथे जे करार झाले, त्यापैकी काहींचा लाभ अहिल्यानगर जिल्ह्याला व्हावा, यासाठी प्रयत्न सुरू आहेत, असेही पालकमंत्री यांनी स्पष्ट केले.

जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना ते म्हणाले, चालू वर्षाचा ८३० कोटीच्या मंजूर आराखड्यापैकी बहुतांश रक्कम मिळाली आहे. मार्चअखेरीस शंभर टक्के खर्च करण्याचे नियोजन केले आहे. येत्या २०२६-२७ चा नियोजन आराखडा ७५६ कोटीचा असला तरी तो १००० कोटीचा करण्याबाबत प्रयत्न आहेत, असे ते म्हणाले. या अंतर्गत श्रीगोंदा तालुक्यातील पेडगाव येथे छत्रपती संभाजी राजे शौर्यस्तंभ उभारण्यासाठी पाच कोटी, नगरच्या पासपोर्ट ऑफिस नूतनीकरणास एक कोटी, गणित विज्ञान प्रदर्शनासाठी एक कोटी देण्याचे नियोजन आहे. पाणंद रस्ता विकास मोहिमेत अधिकाधिक रस्ते घेतले जाणार आहेत. जिल्ह्यातील सर्व प्राथमिक शाळांतून मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहांसाठी ३० कोटी रुपये दिले जाणार आहेत. अहिल्यानगर जिल्ह्याशी संबंधित सर्व प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी मुंबईमध्ये लवकरच बैठक घेतली जाणार आहे. भंडारदरा धरणाला शंभर वर्ष पूर्ण झाल्याने येत्या वर्षभरात विविध कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत, तसेच भंडारदरा व निळवंडे पर्यटन विकास आराखडा तयार केला जाणार आहे असे त्यांनी स्पष्ट केले.

**ज्यांचे फोटो त्यांनी खुलासा करावा**

पारनेर तालुका ड्रग्ज केंद्र होत चालले आहे, सिसपे घोटाळा येथे झाला आहे. पोलिसांनी या बाबी गोपनीय ठेवता कामा नये. जे घडले आहे, व जे गुन्हेगार आहेत. त्यांची माहिती प्रसिद्धी माध्यमांद्वारे जनतेपर्यंत पोहोचवली पाहिजे, असे स्पष्ट करून विखे पाटील म्हणाले ड्रग्ज संदर्भातील आरोपींचे ज्यांच्या समवेत फोटो आहेत, त्या लोकांनी त्याचे खुलासे केले पाहिजे. कारवाई झाल्याने संगमनेर व श्रीरामपूर तालुक्यात बेकायदा वाळू उपसा बऱ्यापैकी आळा बसला आहे. मात्र, अवैध धंदे व काळी काच असलेल्या गाड्यांतून फिरणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत पोलिसांना सूचना दिले आहे. दावोस कराराबाबत संशय घेणारे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचे वक्तव्य हास्यास्पद आहे. त्यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात महाराष्ट्रातून किती उद्योग बाहेर गेले याची श्वेतपत्रिका त्यांनी काढावी, आपले कर्तृत्व त्यांनी आधी मांडावे व मग बोलावे असा सल्लाही विखेने त्यांना दिला.

- नगर -मनमाड रस्ता येथे दीड वर्षात पूर्ण होईल. काही लोकांनी खंडणी मागितल्याने मागच्या ठेकेदार पळून गेले. आताचा जो ठेकेदार आहे, त्यालाही एका लोकप्रतिनिधींनी पैसे मागितले. तो शेवटी केंद्रीय मंत्री गडकरी यांच्याकडे गेला. गडकरींनी त्या लोकप्रतिनिधीला फोन करून हे काय धंदे करता असा सवालही केल्याचा दावा पालकमंत्री विखे यांनी केला. तो लोकप्रतिनिधी कोण आहे हे सर्वांना माहिती आहे, असेही सूचक वक्तव्य त्यांनी केले.

- नगरचा महापौर महायुतीचाच होईल एवढे भाष्य त्यांनी केले. शरद पवार हे विश्वास गमावलेले नेतृत्व आहेत. त्यांच्या पक्षाची दुरवस्था कशी झाली याचे चांगले विशेषण आपण करू शकतो, पण आता नाही, असे स्पष्ट करून विखे म्हणाले, कोणी एकत्र आल्याने काही फरक पडणार नाही. ते एकत्र आल्याने काय परिणाम झाला हे नगरपालिका व महापालिका निवडणुकातून दिसलेच, असे भाष्य त्यांनी केले.

# स्थानिक गुन्हे शाखेची अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई

## शेरीचिखलठाण परिसरात ५ लाखांचा मुद्देमाल जप्त; एकजण ताब्यात

**राहुरी (प्रतिनिधी)–** राहुरी तालुक्यातील शेरीचिखलठाण परिसरात अवैध वाळू वाहतुकीविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत सुमारे ५ लाख १० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एक आरोपी ताब्यात घेण्यात आला आहे, तर ट्रॅक्टर ट्रॉलीचा मालक फरार झाला आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीवर कडक कारवाई करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिले होते. त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे उप.नि.संदिप मुरकुटे व रमीराजा आतार, भगवान थोरात, विशाल तनपुरे, चालक महादेव भांड यांचे विशेष पथक तयार करण्यात आले होते. दिनांक २४ जानेवारी रोजी हे पथक राहुरी पोलीस स्टेशन हद्दीत अवैध वाळू उपसा व वाहतुकीबाबत माहिती घेत असताना, शेरीचिखलठाण गावच्या शिवारातील वनविभाग क्षेत्रातून ट्रॅक्टरद्वारे वाळूची चोरटी वाहतूक होत असल्याची गुप्त माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने शेरीचिखलठाण-संगमनेर रस्त्यावर सापळा रचून संशयित वाहनावर पाळत ठेवली. या दरम्यान, लाल रंगाचा ट्रॅक्टर ट्रॉलीसह येताना दिसताच पथकाने वाहन थांबवून चालकास ताब्यात घेतले. चौकशीत त्याने आपले नाव सुनिल रेवजी भुतांबरे (वय २१, रा. शेरीचिखलठाण) असे सांगितले. त्याच्याकडे वाळू वाहतुकीचा कोणताही वैध परवाना त्याच्याकडे नसल्याचेही स्पष्ट झाले. ट्रॅक्टर ट्रॉलीच्या मालकाबाबत विचारणा केली असता, जमीर पिरन सय्यद (रा. शेरीचिखलठाण) हा मालक असून तो फरार असल्याची माहिती आरोपीने दिली. या कारवाईत पोलिसांनी ५ लाख रुपये किमतीची ट्रॅक्टर ट्रॉली व १० हजार रुपये किमतीची १ ब्रास वाळू असा एकूण ५ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार भगवान बाळासाहेब थोरात यांच्या फिर्यादीवरून राहुरी पोलीस ठाण्यात गु. र. नं. ६८/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३(२), ३(५) तसेच पर्यावरण संरक्षण कायदा कलम ३/१५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास राहुरी पोलीस करीत आहेत.

# रघुवीर खेडकरांचा पद्म सन्मान हा तमाशा कलेचाच गौरव-ना. विखे

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** जिल्ह्याचे भूमिपुत्र व तमाशा कलावंत रघुवीर खेडकर यांचा यंदाच्या पद्म पुरस्काराने झालेला सन्मान महाराष्ट्राच्या ग्रामीण कलेचा गौरव असून तमाशा कलेचा नावलौकिक झाला असल्याची प्रतिक्रिया जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केली.

रघुवीर खेडकर यांना पद्म पुरस्कार जाहीर झाल्यानंतर पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी त्यांचे दूरध्वनीवरून अभिनंदन केले. खेडकर परिवाराचे मोठे योगदान तमाशा कलेसाठी आहे. ज्येष्ठ तमाशा कलावंत स्व. कांताबाई सातारकर यांच्याकडून मिळालेला कलेचा समृद्ध वारसा रघुवीर खेडकर यांनी यशस्वीपणे पुढे नेला. आव्हानात्मक परिस्थितीत तमाशा कलेला जिवंत ठेवण्यासाठी समर्पित भावनेने दिलेल्या योगदानाचा गौरव केंद्र सरकारने पद्म पुरस्कार देऊन केल्याचा अभिमान असल्याचे त्यांनी सांगितले. ग्रामीण महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा अविभाज्य भाग म्हणून तमाशा कलेकडे पाहिले जाते. अनेक ज्येष्ठ श्रेष्ठ कलाकारांनी आपल्या त्यागाने महाराष्ट्राच्या कला परंपरेची जोपासना केली आहे. अशा कलेची सेवा करणाऱ्या प्रत्येक कलावंताचा बहुमान या पुरस्काराने झाला आहे. सहकार चळवळीचे जनक पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ देण्यात येणारा पहिला राज्यस्तरीय कलागौरव पुरस्कार प्रवरा परिवाराने स्व. कांताबाई सातारकर यांना देऊन सन्मानित केल्याची आवर्जून आठवण विखे पाटील यांनी सांगितली.

# साई संस्थान मयत कर्मचाऱ्यांच्या वारसांना बँक ऑफ बडोदाकडून १ कोटींचा विमा

**शिर्डी (प्रतिनिधी)–** श्री साईबाबा संस्थानच्या मयत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांना आर्थिक स्थैर्य देण्यासाठी बँक ऑफ बडोदा आणि साई संस्थान क्रेडिट सोसायटीने पुढाकार घेतला आहे. २६ जानेवारी रोजी आयोजित विशेष कार्यक्रमात १ कोटी ३० लाख रुपयांच्या विमा धनादेशांचे वितरण माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते होणार असून, यावेळी नवनिर्वाचित नगरसेवकांचा गौरवही केला जाणार आहे.

कार्यक्रम २६ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता हॉटेल गोरडीयाज्, शिर्डी येथे डॉ. सुजय विखे पाटील यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. साईबाबा संस्थान, शिर्डी येथील कर्मचाऱ्यांचे पगार खाते बँक ऑफ बडोदा येथे असून, बँकेमार्फत पगार बचत खाते अपघातग्रस्त विमा कवच योजना राबविली जाते. या योजनेनुसार कायम कर्मचाऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्यास वारसांना ४० लाख रुपये, तर कंत्राटी कामगाराच्या वारसांना २० लाख रुपये विमा संरक्षण दिले जाते. या निकषांनुसार ३ मयत कर्मचाऱ्यांच्या वारसांना या कार्यक्रमात एकूण १ कोटी रुपयांचे धनादेश डॉ. सुजय विखे यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को. ऑप सोसायटी लि. शिर्डी यांच्या वतीने देखील संस्थेच्या मयत सभासदांच्या वारसांना नैसर्गिक व अपघाती मृत्यू विमा योजनेअंतर्गत मदत दिली जाणार आहे. सोसायटीच्यावतीने मयत सभासदांच्या वारसांना प्रत्येकी १० लाख रुपये याप्रमाणे एकूण ३० लाख रुपयांच्या धनादेशाचे वाटप याच कार्यक्रमात करण्यात येईल. या मुख्य सोहळ्याचे औचित्य साधून शिर्डी नगरपरिषद व राहाता नगरपरिषद येथील नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार समारंभ देखील डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते आयोजित करण्यात आला आहे. बँक ऑफ बडोदा आणि साई संस्थान को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या या तत्पर मदतीमुळे मयत कर्मचाऱ्यांच्या पश्चात त्यांच्या कुटुंबाला सावरण्यासाठी मोठी मदत होणार असल्याने या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. तरी या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे.

# भेंडा बुद्रुकच्या महिला ग्रामसभेत महिलांच्या सक्षमीकरणावर चर्चा

**भेंडा (वार्ताहर)–** नेवासा तालुक्यातील भेंडा बुद्रुक येथे महिलांच्या ग्रामसभेत बालविवाह प्रतिबंध व एकल महिलांचे सक्षमीकरण यावर चर्चा झाली.

सरपंच सुहासिनी किशोर मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या महिला ग्रामसभेस माजी सरपंच प्रा.उषा मिसाळ, ग्रामपंचायत सदस्य लताबाई सोनवणे, लक्ष्मीबाई गजरे, ग्रामविकास अधिकारी रेवणनाथ भिसे आदींसह महिला उपस्थित होत्या.

महिला सक्षमीकरण, बाल विवाह प्रतिबंध, एकल महिलांच्या समस्या व उपाय, नवीन आलेले वीज मीटर परवानगी न घेता बसवणे, अंगणवाडी व आरोग्य कर्मचारी यांच्याबाबत नागरिकांच्या तक्रारी आल्याने त्यावर नियमानुसार काम व्हावे, वरिष्ठ पातळीवर तक्रारी जाऊ नये यासाठी चर्चा करण्यात आली. तसेच एकल महिलांसाठी संक्रांतीनिमित्त हळदीकुंकू व तिळगुळ, वाण वाटप करून कार्यक्रम पार पडला.

# राहुरी तालुक्यातून एका अल्पवयीन मुलीचे अपहरण

**राहुरी (प्रतिनिधी)–** मेडिकलमधून गोळी घेऊन येते, असे सांगून घरातून बाहेर पडलेल्या अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तिला पळवून नेल्याची घटना राहुरी तालुक्यातील एका गावात घडली आहे. याबाबत माहिती अशी, दि. २१ जानेवारी रोजी मुलगी मेडिकल मधून गोळी घेऊन येते, असे सांगून घरातून बाहेर गेली होती. ती उशीरापर्यंत घरी परतली नाही. तिच्या नातेवाईकांनी तिचा परिसरात व नातेवाईकांकडे शोध घेतला. मात्र ती मिळून आली नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी मुलीचे अपहरण करून तीला पळवून नेले, अशी नातेवाईकांची खात्री झाली. त्यानंतर मुलीच्या वडिलांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात इसमा विरुध्द भारतीय न्याय संहिता कलम १३७ (२) प्रमाणे अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शेवगावचे भूमिपूत्र कराड यांनाही राष्ट्रपती पदक

**शेवगाव (तालुका प्रतिनिधी)–**



शेवगाव तालुक्यातील ढोरजळगाव येथील भूमिपुत्र व सध्या मुंबई येथे पोलीस उपायुक्त (सायबर गुन्हे शाखा) म्हणून कार्यरत असलेले पुरुषोत्तम नारायण कराड यांची उत्कृष्ट व गुणवत्तापूर्ण सेवेसाठी दिल्या जाणाऱ्या भारत सरकारच्या राष्ट्रपती पदकासाठी निवड जाहीर झाली आहे.

शेतकरी कुटुंबातून आलेल्या कराड यांनी लोकसेवा आयोगामार्फत २००२ मध्ये पोलीस उपअधीक्षक म्हणून सेवेत प्रवेश केला. सेवाकाळात त्यांनी राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये कार्यरत राहून कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी उल्लेखनीय कार्य केले आहे. गुन्हेगारी नियंत्रण, जनतेशी थेट संवाद, तक्रार निवारण, महिला व बालसुरक्षेसाठी प्रभावी उपाययोजना तसेच आपत्ती व्यवस्थापनाच्या काळात दाखवलेली तत्परता ही त्यांची ठळक वैशिष्ट्ये ठरली आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक संवेदनशील व गुंतागुंतीच्या प्रकरणांचा यशस्वी तपास करण्यात आला असून त्यामुळे पोलीस दलावरील जनतेचा विश्वास अधिक दृढ झाला आहे.

कर्तव्यदक्ष, शिस्तप्रिय व जनसामान्यांशी आपुलकीने वागणारे अधिकारी म्हणून त्यांची ओळख आहे. २०१० मध्ये त्यांची पोलीस उपायुक्तपदी पदोन्नती झाली, तर २०१४ मध्ये त्यांना भारतीय पोलीस सेवेचे पद मिळाले. त्यांनी गोंदिया, सोलापूर, गडचिरोली, नवी मुंबई आदी जिल्ह्यांमध्ये उल्लेखनीय सेवा बजावली आहे. यापूर्वी केंद्र शासनाचे अंतर्गत सुरक्षा सेवा पदक, राज्य शासनाचे खडतर सेवा पदक, कमांडो फोर्समधील उत्कृष्ट कामगिरीसाठी फोर्स वन पदक, तसेच महाराष्ट्र राज्य पोलीस महासंचालकांचे पदक देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या राष्ट्रपती पदकासाठीच्या निवडीबद्दल शेवगाव तालुक्यासह ढोरजळगाव परिसरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## पान १ वरुन

### संगमनेरचे तमाशा कलावंत...

संगमनेरचे सुपुत्र असलेले खेडकर हे तमाशातील सोंगाड्या या भूमिकेसाठी प्रसिध्द आहेत. दरवर्षी महाराष्ट्रातील गावागावांमध्ये यात्रा भरते. या यात्रेत रघुवीर खेडकर तमाशा सादर करतात. त्यांच्या कलेने संपूर्ण महाराष्ट्राच्या मनावर राज्य केले आहे. त्यांना याआधीही अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेले आहे. तमाशा क्षेत्रातील त्यांच्या योगदानाबद्दल त्यांना 'तमाशा महर्षी' म्हणून ओळखले जाते.

**आईकडून मिळाला लोककलेचा वारसा**

रघुवीर खेडकर यांना तमाशाची कला ही वारशात मिळालेली आहे. त्यांच्या मातोश्री कांताबाई सातारकर या एक महान तमाशा कलावंत होत्या. बालपणापासूनच त्यांच्या मनात तमाशाविषयी प्रेम निर्माण झाले. त्यांनी आईचा वारसा पुढे सुरू ठेवत पारंपरिक लोकनाट्य तमाशाची परंपरा जपली आहे. गेली अनेक वर्षे ते तमाशा मंडळाचे नेतृत्व करत आहेत. कलाक्षेत्रातील अमूल्य योगदानासाठी त्यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा 'जीवनसाधना गौरव पुरस्कार' आणि पठ्ठे बापूराव पुरस्कार यांसारखे महत्त्वपूर्ण राज्यस्तरीय सन्मान मिळाले आहेत. आई कातांबाई सातारकर यांनी स्वबळावर सुरू केलेल्या तमाशा ते आजतागायत यशस्वीपणे सांभाळत आहे. तसेच ते महाराष्ट्र राज्य ढोलकी फड तमाशा संघटनेचे अध्यक्षही आहेत. तमाशा फड मालक आणि कलाकार म्हणूनही त्यांची ख्याती आहे.

करोना काळात तमाशा कलावंतांवर खराब दिवस आले होते. अनेक गावांमधील यात्रा रद्द झाल्याने तमाशा कलावंतांवर उपासमारीची वेळ आली होती. त्यावेळी रघुवीर खेडकर खेडकर यांनी तमाशा कलावंतांच्या मदतीसाठी सरकारकडे मागणी केली होती. त्यांना अनेक तमाशा कलावंतांचा पाठिंबाही लाभलेला होता. करोना संपल्यानंतर तमाशा पुन्हा सुरू झाले आहेत. रघुवीर खेडकर गण, गवळण, बतावणी आणि वगनाट्य अशी पारंपारिक कला सादर करून गावाखेड्यातील लोकांचे मनोरंजन करताना पहायला मिळत आहे. त्यांच्या या कलेची दखल घेत आता त्यांना पद्मश्री पुरस्काराची घोषणा करण्यात आली आहे.

### रसिकांची सेवा केली, त्याची पोचपावती मिळाली

- पद्मश्री पुरस्कार जाहीर होताच रघुवीर खेडकर यांनी आनंद व्यक्त केला. माझ्या सात पिढ्यांचा उद्धार झालाय. लोकांसाठी, समाजासाठी जे झटलो, त्याची पोचपावती मिळाल्याचा मला आनंद आहे. पद्मश्री पुरस्कार जाहीर होताच माझा आनंद गगनात मावत नव्हता. तमाशा लोककलेला हा पहिलाच पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला आहे. हा पुरस्कार मला मिळतोय, हे माझं भाग्य आहे. रसिकांची मी सेवा केली, याची पोचपावती मला मिळाली, याचा मला आनंद आहे, असं खेडकर म्हणाले.

### राहुरीचे तत्कालीन...

शिळीमकर यांनी पुणे ग्रामीणसह मुंबई, सातारा, नागपूर, अहिल्यानगर आदी जिल्ह्यांत सेवा बजावताना गुन्हेगारीविरोधात प्रभावी कारवाई केली आहे. स्थानिक गुन्हे शाखेत कार्यरत असताना त्यांनी संघटित गुन्हेगारी, जबरी चोरी, खून, खंडणी, घरफोडी, अवैध शस्त्रसाठा, दरोडे तसेच महिलांवरील अत्याचार प्रकरणांत मोठ्या प्रमाणावर गुन्हे उघडकीस आणले. नगर जिल्ह्यात कार्यरत असताना अवघ्या काही महिन्यांत २२ गंभीर गुन्ह्यांचा छडा लावून तब्बल ८१ आरोपींना अटक करण्यात आली. तसेच विविध राज्यांतून फरार असलेले गुन्हेगार अटक करून स्थानिक पोलिसांच्या ताब्यात देण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

पुणे ग्रामीण जिल्ह्यातील स्थानिक गुन्हे शाखेत कार्यरत असताना अवैध शस्त्रनिर्मिती, देशी कट्टे, कोयते, तलवारी जप्त करत मोठी कारवाई करण्यात आली. यासोबतच कोट्यावधी रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करून संघटित टोळ्यांचे कंबरडे मोडण्यात आले. निवडणूक काळात शांतता व कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी केलेल्या कामगिरीचेही विशेष कौतुक झाले आहे.

कोरोना महामारीच्या काळात नागरिकांच्या मदतीसाठी वैद्यकीय सुविधा, जीवनावश्यक साहित्य व सुरक्षिततेसाठी केलेले कार्य उल्लेखनीय ठरले. त्यांच्या कार्यशैलीमुळे जनतेमध्ये पोलीस दलाविषयी विश्वास निर्माण झाला आहे. कर्तव्यनिष्ठा, प्रामाणिकपणा, धाडस, उत्कृष्ट तपास कौशल्य आणि नेतृत्वगुण यांच्या जोरावर त्यांनी पोलीस दलात वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या या यशाबद्दल वरिष्ठ अधिकारी, सहकारी व नागरिकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### 'नियोजन' च्या ७५६ कोटी...

परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हा नियोजन अधिकारी दीपक दातीर व विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत २०२५-२६ या चालू आर्थिक वर्षातील जिल्हा वार्षिक योजनेचा आढावा घेण्यात आला. या वर्षासाठी जिल्ह्याकरिता १ हजार २७ कोटी ३१ लक्ष रुपये नियतव्यय मंजूर असून, त्यापैकी ८०१ कोटी ३७ लक्ष रुपये किमतीच्या कामांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. शासनाकडून प्राप्त ५६९ कोटी ९० लक्ष निधीपैकी २२८ कोटी १२ लाख रुपये कार्यान्वयीन यंत्रणांना वितरीत करण्यात आले आहेत. निधी व्यपगत होणार नाही, याची दक्षता घेऊन मंजूर आराखड्यानुसार ३१ मार्चपूर्वी १०० टक्के प्रशासकीय मान्यता देण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी नियोजन विभागाला केल्या. चालू आर्थिक वर्षात जिल्हा परिषदेकडील विविध योजनांसाठी २५४ कोटी २७ लाख रुपये तर नगरपालिका व नगरपंचायतींमधील योजनांसाठी ७६ कोटी रुपये निधी उपलब्ध करून दिला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

विखे पाटील म्हणाले, जिल्ह्यातील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण व्हावी व वैज्ञानिक दृष्टिकोन रुजावा, यासाठी जिल्हा विज्ञान प्रदर्शनासाठीची तरतूद ५ लाखांवरून १ कोटी रुपये करण्यात आली आहे. या निधीतून प्रदर्शनासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निवास व भोजनाची व्यवस्था करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच छत्रपती संभाजीनगरच्या धर्तीवर जिल्ह्यात अद्ययावत हायटेक सायन्स सेंटर उभारण्यासाठी आराखडा तयार करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी व शिक्षण विभागाला देण्यात आल्या. वन विभागाच्या बळकटीकरणासाठी मंजूर ९ कोटी निधीतून नाईट व्हिजन दुर्बिणी, थर्मल ड्रोन्स व वाहनांची उपलब्धता झाली असून, बिबट्या रेस्क्यू सेंटरचा सविस्तर प्रस्ताव शासनास त्वरित सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. रस्ते विकासाचा आढावा घेताना पालकमंत्र्यांनी केवळ रस्त्यांची लांबी न वाढवता गुणवत्तेवर भर देण्याची सूचना केली. रस्त्यांचा दर्जा निकृष्ट आढळल्यास संबंधित कंत्राटदारांचे देयक थांबवून काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही करावी, तसेच रस्त्यांच्या कामासाठी पुणे जिल्ह्याच्या धर्तीवर तांत्रिक निकषांचा वापर करावा, असे आदेश देण्यात आले.

**भंडारदराच्या प्रस्तावासाठी पाठपुरावा**

नोव्हेंबर २०२५ मध्ये १०० वर्षे पूर्ण होणाऱ्या भंडारदरा धरणाच्या शताब्दी महोत्सवासाठी व तेथील ब्रिटीशकालीन विश्रामगृह व उद्यानाच्या नूतनीकरणासाठी पर्यटन विभागाकडे सादर केलेल्या ६८ कोटींच्या प्रस्तावाचा मंत्रिमंडळ स्तरावर पाठपुरावा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर कोपरगाव व संगमनेर येथील भाविकांच्या सोयीसुविधांसाठी कुंभमेळा निधीतून तरतूद करण्याबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

**...तर पोलिस अधिकाऱ्यांचे निलंबन**

कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी व अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस प्रशासनाने कठोर भूमिका घ्यावी, असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले. संगमनेर, राहाता व प्रवरा लोणी परिसरात गुटखा, एमडी ड्रग्ज व अवैध कत्तलखाने सुरू असल्याच्या तक्रारींची गंभीर दखल घेत, यापुढे अशा तक्रारी आल्यास संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई केली जाईल, असेही पालकमंत्र्यांनी सांगितले.

**कोपरगाव क्षेत्रातील महामार्गावरील अपघातांचे प्रमाण लक्षात घेऊन कोपरगाव ग्रामीण रुग्णालयासाठी ॲडव्हान्स लाईफ सपोर्ट रुग्णवाहिका मंजूर करण्याचे निर्देश देण्यात आले. वीज बिल मुक्त ग्रामपंचायत अभियानांतर्गत शासकीय इमारतींवर सौर ऊर्जा प्रकल्प प्रभावीपणे राबविण्याबाबत सूचना करण्यात आल्या. श्रीगोंदा येथील उपजिल्हा रुग्णालयाची इमारत पूर्ण असूनही पदनिर्मितीअभावी रखडलेले हस्तांतरण तातडीने पूर्ण करून तेथे बाह्य रुग्ण विभाग सुरू करण्याचे निर्देश आरोग्य विभागाला देण्यात आले. तसेच जिल्ह्यातील शाळा खोल्यांच्या कमतरतेबाबत शिक्षण विभागाने सर्वेक्षण करून सर्वकष आराखडा सादर करावा, अशी सूचना सदस्यांनी मांडली.**

**बैठकीतील महत्त्वाचे निर्णय**

जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत अकोले धुमाळवाडी येथील सोमेश्वर महादेव मंदिर देवस्थान, संगमनेर तालुक्यातील धांदरफळ बु. येथील विठोबा देव मंदिर देवस्थान व खळी येथील खंडोबा मंदिर देवस्थान, तसेच कोपरगाव तालुक्यातील देर्डे चांदवड येथील मारूती मंदिर देवस्थान ग्रामीण तीर्थक्षेत्रांना क वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्यात आला आहे. यासोबतच, कोपरगाव तालुक्यातील संवत्सर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र शिंगणापूर येथे स्थलांतरीत करण्याच्या प्रस्तावासही या बैठकीत मंजूरी देण्यात आली.